# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

CIN-NO-U40109MH2005SGC153646
४ था मजला, प्रकाशगंगा,प्लॉट क्र. सी- १९, ई- ब्लॉक,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई –५१.
Website: www.mahatransco.in

**कार्यकारी सारांश**

**१. पार्श्वभूमी**

१.१ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) ही राज्य पारेषण उपक्रम असून तिच्याकडे विजेचे निर्मिती स्त्रोतापासून भार केंद्रापर्यंत पारेषण करण्यासाठी राज्य पारेषण प्रणालीचे नियोजन, विकास, संचलन आणि देखभाल ही कामे करण्याची जबाबदारी दिली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित ही कंपनी अधिनियम १९५६ अन्वये स्थापित करण्यात आली.

१.२ विद्युत अधिनियम २००३ नुसार कलम १३१ व ३९ नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित ला राज्य पारेषण उपक्रम म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

१.३ वरील कार्यानुरुप राज्य पारेषण उपक्रम राज्यांतर्गत पारेषण प्रणालीच्या पारेषण शुल्काचे विश्लेषण आणि शुल्काची महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या बहुवर्षीय वीज दर विनियम २०१९ नुसार वापरधारकामध्ये व्यवस्थित विभागणी करण्याचे कर्तव्य पार पाडत आहे.

१.४ महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २०१९, वित्तीय वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ करिता चौथ्या नियंत्रण कालावधीकरिता पारेषण शुल्काच्या निश्चितीची पाहणी करते. यातील विनिमय ६४,६५,६६ हे राज्यांतर्गत पारेषण प्रणालीच्या वापराचा दर निश्चित करण्याची तत्वे व कार्यपध्दती आदेशित करतात.

१.५ महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २०१६ च्या प्रकरण क्र. ९१ मध्ये तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० साठी राज्यांतर्गत पारेषण प्रणालीचे पारेषण दर अधिसूचित केले आहेत. त्यामध्ये २०१८ च्या प्रकरण क्र. २६५, दि. १२ सप्टेंबर २०१८ च्या आदेशानुसार आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० साठीचे पारेषण दरामध्ये बदल केला आहे.

**२. वर्तमान याचिका**

२.१ वर्तमान याचिका ही आर्थिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ करिता दीर्घ कालीन, मध्यम कालीन व अल्प कालीन पारेषण यंत्रणा वापरधारकासाठी राज्यांतर्गत पारेषण प्रणालीच्या पारेषण शुल्काच्या अंदाजपत्रकाच्या मंजूरीसाठी असून ती आयोगाच्या बहुवर्षिय वीज दर विनियम २०१९ मध्ये दिलेल्या तत्वानुसार आहे.

**तक्ता १: ४ थ्या नियोजित कालावधीकरिता नियोजित पारेषण शुल्क**

| तपशील | दर | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पारेषण यंत्रणा शुल्क (TTSC) | रु. कोटीमध्ये | १२,२६०.५६ | ७,५४३.१५ | ७,९४९.७३ | ८,६६८.६१ | ९,४१४.९९ |
| आधारभुत पारेषण क्षमता हक्क | एम.डब्ल्यू. | २२,१५४.८७ | २३,३०४.०८ | २४,५१३.५१ | २५,७८७.७० | २७,१३०.२३ |
| पारेषण शुल्क (दिर्घकालीन मुदत/मध्यमकालीन मुदत) | रु./के.डब्ल्यु/महिना | ४६१.१७ | २६९.७४ | २७०.२५ | २८०.१३ | २८९.१९ |
| पारेषण शुल्क (अल्पकालीन मुदत/ सामुदायिक अल्पकालीन मुदत /नूतनशील ऊर्जा) | रु./के.डब्ल्यू.एच. | ०.७७ | ०.४६ | ०.४७ | ०.४९ | ०.५२ |
| पारेषित ऊर्जा एकक (विद्युत वितरण कंपन्यांच्या माहिती आधारे) | एम.यू. (MUs) | १,५९,७००.९३ | १,६५,००५.११ | १,७०,५९७.४५ | १,७६,४९८.५१ | १,८२,७३४.६४ |

२.२ आर्थिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ साठीचे राज्यांतर्गत पारेषण प्रणालीचे एकूण पारेषण यंत्रणा शुल्क

पारेषण शुल्क संरचनेनुसार राज्यातील सर्व पारेषण परवानाधारक हे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे भाग असतील आणि त्यांची आर्थिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ साठीची एकत्रित प्रकल्पित महसूली गरज (ARR) ही एकूण पारेषण प्रणाली शुल्क निश्चित करण्यासाठी गृहित धरली आहे.

**तक्ता २: प्रकल्पित एकूण पारेषण यंत्रणेचे शुल्क (TTSC) पारेषण यंत्रणा वापर धारकांद्वारे देय (TSU) (रु. कोटीमध्ये)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| | वार्षिक | वार्षिक | वार्षिक | वार्षिक | वार्षिक |
| म.रा.वि.वि.कं.लि. (MSEDCL) | १०,२९३.७८ | ६,३५२.५६ | ६,७१५.३६ | ७,३४४.३४ | ७,९९९.७६ |
| टा.पॉ. कं मर्या.- ड्रि. (TPCL-D ) | ४५२.१८ | २७१.७१ | २७९.६७ | २९७.८२ | ३१५.८६ |
| अ.इ.मुं.मर्या.- ड्रि. (AEML-D) | ८३५.३२ | ५०७.०५ | ५२७.२१ | ५६७.१४ | ६०७.६२ |
| बेस्ट | ४५८.१९ | २७४.०९ | २८०.८५ | २९७.७३ | ३१४.३६ |
| भारतीय रेल्वे (DDL) | २०७.५८ | १२८.९१ | १३७.१३ | १५०.९२ | १६५.४२ |
| मा.बि.पा.प्रा.मर्या. (MBPPL (DDL) | ७.२५ | ४.२५ | ४.२६ | ४.४२ | ४.५७ |
| गिगाप्लेक्स Gigaplex (DDL) | ३.२२ | २.०१ | २.१४ | २.३७ | २.६१ |
| निदार युटीलिटीज् (Nidar Utilities) | ०.२७ | ०.१६ | ०.१६ | ०.१६ | ०.१७ |
| के.आर.सी.आय.पी.पी.एल (KRCIPPL) | २.७७ | २.४३ | २.९५ | ३.७० | ४.६२ |
| एकूण | १२,२६०.५६ | ७,५४३.१५ | ७,९४९.७३ | ८,६६८.६१ | ९,४१४.९९ |

२.३ पारेषण प्रणाली वापरधारकांमधील एकूण पारेषण प्रणाली शुल्काची प्रकल्पित विभागणी

प्रकल्पित पारेषण प्रणाली वापरधारकमधील एकूण पारेषण प्रणाली शुल्काची विभागणी ही प्रत्येक पारेषण प्रणाली वापरधारकाच्या आधारभूत पारेषण क्षमता हक्क आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये वाटून दिलेल्या एकूण आधारभूत पारेषण क्षमता हक्काच्या प्रमाणात असेल.

**तक्ता ३: वार्षिक एकत्रित महसुलाची पारेषण परवानाधारकाची प्रकल्पित वसूली (रु.कोटीमध्ये)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०२०-२१ | आर्थिक वर्ष २०२१-२२ | आर्थिक वर्ष २०२२-२३ | आर्थिक वर्ष २०२३-२४ | आर्थिक वर्ष २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|
| | वार्षिक | वार्षिक | वार्षिक | वार्षिक | वार्षिक |
| म.रा.वि.पा.कं.लि. (MSETCL) | ८,५९१.८४ | ४,७७५.०२ | ४,९७७.५४ | ५,१०१.४१ | ५,२५०.३७ |
| अ.ट्रा. इं. लि. (ATIL) | २६६.९७ | ११४.९८ | ११०.४२ | १०५.८६ | १०१.३७ |
| म.इ.ग्री.पॉ.ट्रा. कं.मर्या.(MEGPTCL) | १,८५७.०० | १,०५०.७५ | १,०१३.९६ | ९७७.३४ | ९४०.९० |
| वि.इं.पॉ.मर्या- ट्रा (VIPL-T) | २.२७ | ४.०७ | ३.९३ | ३.७९ | ३.६६ |
| अ.इ.मुं.मर्या.-ट्रा (AEML-T) | ४०१.६३ | ५५०.६५ | ७२३.९४ | १,२९८.०६ | १,८८३.१७ |
| टा.पॉ. कं.- ट्रा (TPC-T) | ९५९.२९ | ९२८.०६ | १,००४.६६ | १,०७१.९६ | १,१२९.६२ |
| ज.पॉ.ट्रा.मर्या. (JPTL) | ९६.८७ | ७२.९२ | ७०.२४ | ६६.८१ | ६४.१५ |
| अ.पॉ. ट्रा. कं.मर्या. (APTCL) | ८४.६९ | ४६.७० | ४५.०४ | ४३.३८ | ४१.७५ |
| एकूण | १२,२६०.५६ | ७,५४३.१५ | ७,९४९.७३ | ८,६६८.६१ | ९,४१४.९९ |